# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

## परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, अधिसभेच्या दिनांक २१ फेब्रुवारी, २०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील मान्य ठरावान्वये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांच्या रजेसंदर्भात या पुर्वी विद्यापीठाने संदर्भ क्र. शैक्ष. वि./अनुयज्ञेय रजा/२०२३/५३२६-३०, दिनांक १८/०७/२०२३ अन्वये कळविण्यात आले होते. उपरोक्त परिपत्रकाची प्रत पुनःश्च निर्गमित करुन विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, परिपत्रकातील मुद्दयांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
(सोबत: परिपत्रकाची प्रत जोडली आहे.)

तसेच सदर परिपत्रक विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सर्व संबंधीतांनी या परिपत्रकाची नोंद घ्यावी, हि विनंती.

विद्यापीठ प्रांगण, ::
छत्रपती संभाजीनगर - ४३१००४ संदर्भ क्रं. अभ्यासक्रम ::
विभाग/अनुयज्ञेय रजा/२०२६/ 3323 - 3822 ::
दिनांक : १३/०५/२०२६ *****

कुलसचिव

प्रतिलिपी माहिती तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१) सर्व प्राचार्य/ प्राचार्या/ संचालक, संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) मा. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४) उपकुलसचिव, आस्थापना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

JK13052026/-*

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad-431 004, Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900 400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Syllbaus (0240) 2403209 /2403120
Web Site : www.bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :: शैक्षणिक विभाग

# सुधारीत परिपत्रक

संदर्भ :-

१. विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक १८ जुलै, २०१८ रोजीची अधिसुचना
२. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९
३. दिनांक १२-०३-२०२३ रोजीच्या अधिसभेत झालेली चर्चा.
४. या कार्यालयाचे परिपत्रक संदर्भ क्रं शैक्ष.वि/अनुज्ञेय रजा/२०२३/४६०९-१४

मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये व संदर्भिय ०३ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांतील प्राचार्यांना संदर्भिय परिपत्रक क्रं ०४ नूसार अध्यापकांच्या रजेसंदर्भात कळविण्यात आलेले होते.

आता मा. मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये संदर्भिय परिपत्रक क्रं ०४ अधिक्रमित करून सुधारीत परिपत्रक खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे -

सर्व संलग्नित महाविद्यालयातील शासन मान्य वेतन अनुदानित पदावर शिक्षकांसाठी संदर्भिय क्रं ०१ अनुषंगाने महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी संदर्भिय क्रं ०२ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील रजे संदर्भात मुद्दा क्रं १६ मध्ये "**. Leaves:- Study leave, Maternity leave, medical leave shall be admissible to the teachers at par with the state government employees.**" अशी तरतूद आहे.

उक्त संदर्भिय क्रं ०२ शासन निर्णयात शासन मान्य वेतन अनुदानित पदावर कार्यरत शिक्षकांसाठी लागू असलेल्या रजा नमूद आहेत व त्यात वैद्यकीय रजा सुध्दा लागू केलेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियमांमध्ये उपरोक्त नमूद रजा प्रकार व त्या रजा कशा प्रकारे व किती रजा अनुज्ञेय आहेत याबाबत तरतूद नमूद केलेली आहे. त्यातील नियम ६० मधील तरतुद खालीलप्रमाणे आहे —

" <u>६०. अर्धवेतनी रजा</u>

(१) (ए) शासकीय कर्मचा-यांस त्याने सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक वर्षासाठी २० दिवसांची अर्धवेतनी रजा मिळण्याचा हक्क असेल.

(बी) वरील खंड (ए) खाली देय होणारी रजा वैद्यकीय प्रमाणपत्रावर अथवा खाजगी कामासाठी देता येईल :

----- "

करिता सर्व संचालक/प्राचार्यांनी उपरोक्त नूसार आपल्या स्तरावरून कार्यवाही करावी व सदर परिपत्रक आपल्या अधिनस्थ शिक्षकांच्या निदर्शनास आणून दयावे. तसेच रजेच्या नोंदी संबंधित शिक्षकांच्या सेवापुस्तिकेत वेळोवेळी अद्ययावत करण्यात याव्यात.

**विद्यापीठ प्रांगण,** ::
**औरंगाबाद-४३१००४**
**संदर्भ क्रं. शैक्ष. वि./अनुज्ञेय रजा /२०२३/5326-30** ::
**दिनांक : १८.०७.२०२३** ::

**कुलसचिव**

*******

**प्रतिलिपी माहिती तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषितः-**

१) सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३) संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४) उपकुलसचिव, आस्थापना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
५) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.